महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु–मार्च २०२३ लेखी परीक्षा वेळापत्रकाबाबत...

# प्र क ट न

फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षांची संभाव्य वेळापत्रके मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. १९/०९/२०२२ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली असून, सदर वेळापत्रकांबाबत सूचना असल्यास मंडळाकडे १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार संघटना, पालक, शिक्षक यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचनांचे अवलोकन करून इ.१२वी व इ.१०वी ची वेळापत्रके अंतिम करण्यात आलेली आहेत. अंतिम वेळापत्रकानुसार लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १) | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व व्दिलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम | मंगळवार, दि. २१ फेब्रुवारी, २०२३ ते मंगळवार दि. २१ मार्च २०२३ |
| २) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा | गुरूवार, दि. ०२ मार्च २०२३ ते शनिवार, दि. २५ मार्च २०२३ |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर अंतिम वेळापत्रके मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर दि. ३०.१२.२०२२ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ठ व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअॅप किंवा तत्सम माध्यमातुन व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी परीक्षा व अन्य विषयांच्या परीक्षांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी मंडळामार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येईल.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : – ३०.१२.२०२२

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

क्र.मुविमं/माध्य.परीक्षा/३०२/ ३७९६
वाशी, नवी मुंबई-४००७०३.
दिनांक ०२/०१/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक,
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा
मुंबई/बृहन्मुंबई/ठाणे/पालघर/ रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(डॉ. सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई, ४०० ७०३.

प्रतिः–

सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळाप्रमुख,

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः–

१) शिक्षणाधिकारी(माध्य), ठाणे/पालघर/रायगड जिल्हा २) शिक्षण निरीक्षक, दक्षिण/उत्तर/पश्चिम विभाग, मुंबई.

३) प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/शहापूर/जव्हार/पेण.

यांनी आपल्या अधिपत्याखालील माध्यमिक शाळांना परिपत्रक निर्दशनास आणावे.